जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३०६ दिनांक - ०१/०८/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर

## फिरण्यासाठी गाडया चोरणा-या आरोपीकडुन ११ दुचाकी गाडया जप्त

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ६२६/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०३(२)अन्वये गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेत असताना **पोलीस अंमलदार नामदेव रेणुसे** यांना त्यांचे बातमीदारामार्फेत बातमी मिळाली की, एक इसम नमुद गुन्हयातील चोरीस गेले दुचाकी गाडीसह फिरत आहे.त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर आरोपीतांचा शोध घेत असताना सातारा रोडवरील भुयारी मार्गालगतचे लोखंडी पुलाजवळ इसम नामे **श्रावण माधव शिंदे, वय २६ वर्षे,रा.साईराम हाईटस, रेणुका पार्क, उबाळेनगर,वाघोली,पुणे** हा गुन्हयातील चोरीस गेले दुचाकी मोटार सायकल,हिच्यासह मिळुन आल्याने त्याचेकडे अधिक तपास करता त्यांनी गाडी चोरी केल्याची कबुली दिल्याने ती गाडी पंचनाम्याने जप्त करुन त्यास नमुद गुन्हयात अटक केली आहे.अटके दरम्यान आरोपीकडे केले तपासामध्ये आरोपीकडुन **६ लाख रुपये किंमतीच्या एकुण ११ दुचाकी गाडया जप्त करण्यात आल्या असुन सदर गाडयांबाबत कोठे गुन्हे दाखल आहेत याबाबत तपास चालु आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील,पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार नामदेव रेणुसे,हनमंत मासाळ,चेतन गोरे,निलेश जमदाडे,सतिश मोरे, महेश बारवकर,निलेश ढमढेरे,शैलेश साठे,मंगेश पवार,निलेश खैरमोडे,धनाजी धोत्रे,सचिन सरपाले, अभिनय चौधरी,मितेश चोरमोले,सागर बोरगे यांच्या पथकाने केली आहे.


FOR